शा.म.मु.-ब०,००० पु. (२५ x ६)-२०१०-२०११ ३-बि (खंड) ३५९

FORM - 1A

N.C.R.B.
I.I.F.-I

061

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र   जिल्हा District: मुंबई   पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि.   पहिली खबर क्र. FIR No.: 20   वर्ष Year: 2018   दिनांक Date: 16/05/2018

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम   कलमे Sections: 7, 12, 13(1)(D) सह 13(2)
   (ii) अधिनियम Act: -   कलमे Sections: -
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: -

3. (a) अपराधाची घटना : वार Occurence of offence : Day ........ तारीख पासून Date from 11/5/2018 वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to 15/5/2018 वेळ Time ........

3. वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खुण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date 11/5/2018 वेळ Time ........

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क. General Diary Reference : Entry No. ........ तारीख Date 16/5/2018 वेळ Time 07.10

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी/बीट/दुरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. ........ Chouki/Beat/O.P. Name and No. म्युनसिपल मार्केट आवार

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name: काळाचौकी   ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road: जी.पी.रोड

   जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address
   (a) नाव Name: मोहम्मद आमीर शाह   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husbands Name: मोहम्मद जहीर शाह
   (c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age: 49 वर्षे   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय   फोन नं. Phone No.: 9769149207
   (e) पारपत्र क्रमांक Passport No.: -   दिल्याचा दिनांक Date of Issue: -   दिल्याचे ठिकाण Place of Issue: -   (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion: मुस्लीम   जात Caste ........   जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता : गल्ली/सर्वे नं. Address : Ward: आझादनगर   घर/नाव नंबर House/Name No.: 5   फोन/मो. नंबर Phone/M. No. ........ पॅन नं. Pan No. ........ ओटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road: डी.टी.एम. रोड   जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place: अकबर लाला कम्पाउंड   गाव Village ........ पोस्ट Post ........ पो.स्टे P. Stn. ........
   तालुका Taluka: घाटकोपर(प)   जिल्हा Dist.: मुंबई   राज्य State: महाराष्ट्र   सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या शिटवर भरून तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

   (1) अशोक आनंदा शेळके, वय 42 वर्षे, धंदा- नोकरी (प्रभारी मुकादम, एफ/दक्षिण महानगरपालिका कार्यालय, परेल, मुंबई)
   (2) सज्जाद जब्बार खान, वय 48 वर्षे (मध्यस्थी खाजगी इसम)

थाणीत फिर्यादी मोहम्मद अमीर मोहम्मद जहीर शहा यांचा फिर्यादी जबाब स्वतंत्र कागदावर नोंद करण्यात आला असून, तीच सदर गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(signature)

(गणेश के धोकट)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता आलेल्या विलंबाची कारणे ..... पडताळणीअंती त्वरीत .....
Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.
..... 50,000/- लाचेची रक्कम .....

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकुण मूल्य .....
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties) 50,000/- लाचेची रक्कम

11. अकस्मात मृत्यु / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..... .....
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील मजकूर तारीख, वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी त्यांचे ओळखीचे लेकाच्या झोपड्या पात्र करुन नवीन योजनेतील सदनिका मिळवून देण्यासाठी यातील आलोसे यांना रु. ३ लाख देवूनही सदर सदनिकेचे 'मुळ वितरणपत्र' देण्यासाठी आलोसे क्रमांक 1 याने कायदेशीर पारिश्रमिकाखेरीज पारितोषिक म्हणून आणखी रु. 50,000/- रोख रक्कमेची लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम खाजगी इसम आरोपी क्र. 2 ला देण्यास सांगितल्याने आज रोजी आरोपी क्रमांक 2 याने फिर्यादीकडून रु. 50,000/- लाचेची रक्कम स्विकारली. म्हणून गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** .— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा .....

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. .....

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..... जिल्हा ..... राज्य .....

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) ..... Rank ..... No. ..... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..... (3) Transferred to P. S. .....
District ..... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकुन बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and thumb impression
of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name ..... गणेश के चोकर
पदनाम Rank .....
तपासिक अं. चा कोड क्र. पोलीस निरीक्षक
Posting लाप्रवि, मुंबई.
Coding No. of I. O. .....

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख .....
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

फिर्याद                    दिनांक— १५/०५/२०१८

श्री. मोहम्मद अमीर मोहम्मद जहीर शाह, ४९ वर्षे, धंदा—टॅक्सी ड्रायव्हर, राहि— रुम नं.५, आझाद नगर, अकबर लाला कंम्पाऊंड, डी.व्ही.एस.रोड, घाटकोपर (पश्चिम), मुंबई— ४०००८६, मो.क्र. ९७६९१४९२०७.

........

मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्यावर माझे कुटूंबीयांसोबत जन्मापासुन राहत आहे. मी पुर्वी मोटार ड्रायव्हींग स्कुल चालविण्याचा व्यवसाय करीत होतो. सदरचा धंदा कमी झाल्याने सध्या मी टॅक्सी चालवित आहे. टॅक्सी व्यवसाय उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित आहे. तसेच फावल्या वेळेत समाजसेवा करण्याचे कार्य करीत आहे. त्यामध्ये गरजू लोकांची सरकारी कार्यालयामधील छोटी मोठी कामे करतो.

कॉटनग्रीन, जकारीया बंदर, रेल्वे लाईन लगत असलेली झोपडपट्टी महानगर पालिकेमार्फत तोडण्यात आल्याने झोपडपट्टीमधील लोक बेघर झाले होते. त्या लोकांनी आझाद मैदान, मुंबई येथे आंदोलन केले होते. त्यामध्ये माझे ओळखीचे इजहार, किस्मत अली व हदीस हे झोपडपट्टीधारक मला भेटून आमचे एफ/साऊथ वॉर्ड, परेल, मुंबई येथे घर मिळविण्याकरीता पात्रताचे काम म.न.पा. कार्यालयाकडुन करुन दया, अशी त्यांनी मला विनंती केली.

त्यावर माझे ओळखीच्या लोकांच्या तोडलेल्या झोपडयांच्या कागदपत्राबाबत एफ/साऊथ वॉर्ड, म.न.पा. कार्यालयात जावून संबधीत अधिकाऱ्यांला जावून भेटलो असता त्यांचे नांव श्री नितीन जाधव असल्याचे मला समजले. मी त्यांना झोपडपट्टी धारकांचे कागदपत्र दाखविले. त्यावर त्यांनी मला त्यांचा पी.ए. श्री अशोक रोकडे यांना भेटण्यास सांगितले. तेव्हा मी श्री अशोक रोकडे यांना भेटून सदरची कागदपत्रे दाखविली. श्री रोकडे यांनी मला सांगितले की, ''प्रत्येक झोपडीधारकाला नवीन घर मिळण्याकरीता रु. ५ लाख दयावे लागतील'' त्यावर मी त्यांना सांगितले की, सदरचे '' झोपडीधारक हे गरीब लोक असून एवढी रक्कम ते देवु शकत नाही, काही कमी करा''. असे म्हणालो असता, श्री रोकडे यांनी रु. ४ लाख रक्कम दयावी लागेल असे सांगितले त्यातील पहिली रक्कम काम होण्याअगोदर म्हणजे रु. ३ लाख पहिले दयावे लागतील असे सांगितले, त्यास मी तयार झालो. त्याप्रमाणे झोपडीधारक इजहार अली यांची कागदपत्र रोकडे यांना दिली. जानेवारी २०१८ मध्ये रोकडे यांच्या सांगण्यावरुन त्यांचा मित्र भंगारवाला सज्जाद याच्याकडे रु.१,२०,०००/— दिली होती. त्यानंतर बाकी रु. १,८०,०००/— इतकी रक्कम फेब्रुवारी २०१८ मध्ये श्री रोकडे यांना दिली होती. त्यानंतर मी, नितीन जाधव साहेब यांना जावून भेटलो व पैश्याबाबत विचारणा केली असता त्यांनी रोकडे यांचेकडून घराची चावी घेण्यासाठी सांगितले. त्याप्रमाणे रोकडे यांनी शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई येथील घराची चावी व अलॉटमेंटची झेरॉक्स मला दिली. त्यावर झोपडीधारक इजहार याने माझेकडे नवीन घराचे ओरीजनल अलॉटमेंटचे पेपर मागितले असता मी त्याला म्हणालो की, मी साहेबांशी बोलतो. त्यादरम्यान झोपडीधारक किस्मतअली व हदीस हे दोघे मला भेटले व त्या दोघांनी मिळुन रु. ३ लाख रुपये माझेकडे दिले सदरची रक्कम मी रोकडे यांना दिली. त्यानंतर मी इजहार यांचे घराचे ओरीजनल अलॉटमेन्ट लेटरसाठी जाधव व रोकडे याना भेटलो, त्यांनी मला अजुन रु.५०,०००/— ची मागणी केली व इतर दोन

झोपडपट्टीधारकांच्या कागदपत्रांची प्रत्येकी ४,००,०००/— रुपये दयावे लागतील असे सांगितले. त्यानंतर मी दिनांक ०७/०५/२०१८ रोजी जाधव व रोकडे यांना त्यांच्या एफ/साऊथ वॉर्ड कार्यालयात जावून भेटलो. त्यावेळी जाधव यांनी मला सांगितले की, अलॉटमेंट लेटरचे ५०,०००/— दयावे लागतील. सदरची रक्कम मला त्यांना दयावयाची इच्छा नसल्याने त्यांच्याविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता मी दिनांक ११/०५/२०१८ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय, वरळी, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो.

मी दिनांक ११/०५/२०१८ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो असता, तेथे मी वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. त्यांनी माझी तक्रार ऐकून घेतली व मला सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री राजेंद्र ठाकरे व पोलीस निरीक्षक गणेश धोकट यांची भेट घालून दिली. त्यानंतर मी पो.नि. धोकट यांना भेटुन माझी लोकसेवक श्री. जाधव व श्री रोकडे यांनी घराचे अलॉटमेन्टचे मुळ कागदपत्र देण्यासाठी माझेकडे लाचेची मागणी केली असल्याबाबत लेखी तक्रार दिली व त्यावर मी सही केली आहे.

त्यानंतर पो.नि.गणेश धोकट यांनी दोन शासकीय पंचांना मी दिलेली तक्रार वाचण्यासाठी दिली. पंचांनी ती तक्रार वाचल्यानंतर त्यावर सहया केल्या व पो.नि. गणेश धोकट यांनीही तक्रारीवर समक्ष म्हणून सही केली. त्यानंतर पो.नि. धोकट यांनी त्यांचे सोबत असलेले स.पो.आ. श्री राजेंद्र ठाकरे हे सदर कारवाईच्या वेळी देखरेख अधिकारी म्हणून असल्याचे सांगितले.

माझी तक्रार लिहून घेतल्यानंतर दिनांक ११/०५/२०१८ रोजी दोन शासकिय पंचासमोर पडताळणी करणार असल्याचे मला पो.नि. गणेश धोकट यांनी सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. धोकट साहेब व स.पो.आ. ठाकरे साहेब यांनी पंचांसमक्ष माझे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मला व दोन शासकिय पंचाना ला.प्र.वि.तील गोपनीय कक्षात नेवून माझे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले.

त्यानंतर दिनांक ११/०५/२०१८ रोजी १४.५० वा. सापळा पथकातील अधिकारी, अंमलदार व दोन शासकिय पंच यांचेसह शासकीय वाहनाने वरळी अॅन्टी करप्शन ऑफिस येथून सरपोचखानवाला रोड, अॅनी बेझेंट मार्ग, दिपक सिनेमा, फितवाला रोड, एलफिस्टन रेल्वे स्टेशनच्या बाजुस शासकीय वाहने उभी केली. तेथे मला पोलीस निरीक्षक श्री. धोकट साहेब यांनी पडताळणी संदर्भात सुचना दिल्या. सुचनांच्या अनुषंगाने मला व्हाईस रेकॉर्डर लावून पंच क्र.१ श्री. कुंडलिक कांबळे यांचेसोबत पायी चालत एफ/साऊथ वॉर्ड, मनपा कार्यालय,परेल, मुंबई येथे लोकसेवक श्री. नितीन जाधव व श्री. अशोक रोकडे यांना त्यांचे कार्यालयात भेटण्यासाठी गेलो असता दोन्ही लोकसेवक कार्यालयात उपस्थित नसल्याने मी व पंच यांचेसह परत शासकीय वाहन थांबले होते त्या ठिकाणी परत आलो त्यावेळी १५.५७ वाजले होते. त्यानंतर पो.नि. गणेश धोकट यांनी माझे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केले व मला घडलेली हकिगत विचारली असता, मी त्यांना लोकसेवक कार्यालयात उपस्थित नसल्याचे सांगितले.

त्यानंतर पोनि. श्री. धोकट व स.पो.आ.ठाकरे यांनी विचारविनिमय करुन फितवाला रोड, एलफिस्टन रेल्वे स्टेशन येथे रहदारी असल्याने शासकीय वाहने दुरदर्शन पाठीमागील बाजुस, हिंद सायकल कंपनी समोर येथील मोकळया जागेत उभी करण्यात आली. तेथे पुन्हा पोनि. श्री. धोकट यांनी १७.११ वाजता मला व्हाईस रेकॉर्डर लावून मी पंच क्र.१ श्री. कांबळे यांचे सोबत माझी मो.सायकल क्र. एमएच०३-बीएक्स-४७२६ वर बसून आलोसे यांचे कार्यालय एफ/साऊथ वॉर्ड, मनपा कार्यालय,परेल, मुंबई येथे भेटण्यास गेलो असता तेथे लोकसेवक श्री. नितीन जाधव व श्री. अशोक रोकडे हे भेटले नाहीत. म्हणून पुन्हा माझे मो.सायकलने पंच यांच्या समवेत शासकीय वाहने उभे केलेल्या ठिकाणी परत आलो त्यावेळी १८.२४ वाजले होते. त्यानंतर पोनि. श्री. धोकट यांनी व्हाईस रेकॉर्ड काढुन बंद केला. त्यानंतर मला विचारपुस केली असता लोकसेवक हे त्यांचे कार्यालयात नसल्याचे मी सांगितले. त्यावरुन आम्ही अॅन्टी करप्शन ब्युरो, मुंबई येथे गेलो व मला योग्य त्या सुचना देवून दि.१४/०५/२०१८ रोजी सकाळी १०.०० वा. कार्यालयात येण्यास सांगितले.

दिनांक १४/०५/२०१८ रोजी सकाळी मी पुन्हा मी अॅन्टी करप्शन ब्युरो मुंबई कार्यालयात आलो व पो.नि. धोकट यांची भेट घेतली त्यानंतर पो.नि. धोकट यांनी पंचासमक्ष माझे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर सापळा पथकातील अंमलदार व शासकिय पंच यांचेसह शासकीय वाहनाने वरळी अॅन्टी करप्शन ऑफिस येथून सरपोचखानवाला रोडने, अॅनी बेझंट रोड मार्गे, दुरदर्शनचे पाठीमागील बाजुस हिंद सायकल कंपनी समोरील मोकळया जागेत पोहचलो. तेथे मला पो. नि. धोकट यांनी पडताळणी कारवाईसंदर्भात सुचना दिल्या. सुचनांच्या अनुषंगाने मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री.कांबळे यांचेसोबत १२.२१ वाजता माझी मो.सायकल एमएच०३-बीएक्स-४७२६ने लोकसेवक यांचे कार्यालय एफ /साऊथ वॉर्ड, मनपा कार्यालय, परेल मुंबई येथे श्री. नितीन जाधव व श्री. अशोक रोकडे यांना भेटण्यासाठी गेलो असता लोकसेवक कार्यालयात उपस्थित नसल्याने त्यांची भेट न झाल्याने पुन्हा माझे मो.सायकलने पंचासह शासकीय वाहने उभी केलेल्या ठिकाणी १२.४९ वाजता परत आलो. त्यानंतर पोनि.धोकट यांनी मला लावण्यात आलेला व्हाईस रेकॉर्डर बंद केला व माझेकडे विचारपुस केली असता लोकसेवक कार्यालयात नसल्याचे सांगितले. त्यावरुन पोनि. धोकट व सपोआ.ठाकरे यांनी मला ला.प्र.वि.कार्यालय,वरळी,मुंबई येथे नेवून योग्य त्या सुचना देवून दिनांक १५/०५/२०१८ रोजी सकाळी ला.प्र.वि.कार्यालय येथे येण्यास सांगितले.

त्यानंतर दिनांक १५/०५/२०१८ रोजी सकाळी पुन्हा मी ला.प्र.वि, मुंबई कार्यालयात मी सकाळी ०९.३० वा. हजर झालो असता पो.नि. धोकट साहेब व स. पो.आ. ठाकरे यांची भेट घेतली. त्यांनी पंचांसमक्ष माझे पुन्हा वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर सापळा पथकातील अंमलदार व दोन शासकिय पंचासह शासकीय वाहनाने वरळी अॅन्टी करप्शन ऑफिस येथून सर पोचखानवाला रोड मार्गे, अॅनी बेझंट रोड, दुरदर्शनचे पाठीमागील बाजुस हिंद सायकल कंपनी समोरील मोकळया शासकीय वाहने उभी केली. तेथे मला पो.नि.धोकट यांनी पडताळणी कारवाईसंदर्भात्त सुचना दिल्या. सुचनांच्या अनुषंगाने मला १०.२५ वाजत्ता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. कांबळे यांचेसोबत माझी मो.सायकल एमएच०३-बीएक्स-४७२६ने लोकसेवक यांचे कार्यालय एफ /साऊथ वॉर्ड, मनपा कार्यालय, परेल, मुंबई येथे श्री. नितीन जाधव व श्री. अशोक रोकडे यांना

भेटण्यासाठी गेलो तेव्हा मनपा अधिकारी श्री.नितीन जाधव हे त्यांचे कार्यालयात उपस्थित होते. श्री.जाधव यांच्या समक्ष एक अनोळखी व्यक्ती बसली होती. मी जाधव यांचेकडे माझे कामाचे काय झाले याबाबत विचारणा केली असता ते मला जोरात रागाने बोलले व मला बाहेर जाण्यास सांगून काळाचौकी येथील भंगारवाला सज्जाद याला जावून भेट असे सांगितले. जाण्याच्या अगोदर त्यांनी मला रोकडे यांना भेटून त्यांचेशी बोलण्यास सांगितले. मी बाहेरील पॅसेजमध्ये त्यांचे समोर बसलेला इसमाची बाहेर येण्याची प्रतिक्षा करु लागलो. थोडया वेळाने अनोळखी इसम बाहेर आल्याचे मी पाहिले त्यावर मी लगेच श्री.जाधव यांच्या केबीनमध्ये जावून घराचे ओरिजनल अलॉटमेंट मिळण्याबाबत विनंती केली तेव्हा त्यांनी भंगारवाला सज्जाद यांच्या मोबाईलवर संपर्क साधून भंगारवाला सज्जाद यास माझे काम पुर्ण करुन देण्यास सांगून मला या कार्यालयात न पाठविण्याबाबत सांगितले. तेव्हा श्री जाधव यांचे ऑफिसमध्ये श्री. अशोक रोकडे हे आले व मी त्यांच्याशी बोलू लागलो असता ते माझेशी न बोलता खाली तळ मजल्यावर पार्कींग पॅसेजमध्ये त्यांची मोटार सायकल लावलेल्या ठिकाणी जावू लागले त्यावेळी मी त्यांच्या पाठोपाठ जावून त्यांचेशी कामाबाबत बोलणी करुन घराचे ओरीजनल अलॉटमेंट कागदपत्रांची मागणी केली असता रोकडे यांनी '' पच्चास देना पडेगा और सज्जाद को जाके मिलो '' असे सांगून रोकडे हे त्यांच्या मोटार सायकलवर बसून निघून गेले. त्यानंतर मी व पंच श्री. कांबळे यांचेसह माझे मोटार सायकलने परत पोलीस पथक थांबले होते तेथे आलो. तेथे माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पो.नि. धोक्रट यांनी काढून बंद केला. पो.नि. धोक्रट व सपोआ ठाकरे यांना मी घडलेली हकिकत सांगितली. पो.नि. धोक्रट यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पंचासमक्ष चालू करुन श्री.रोकडे यांनी पैशाची मागणी केल्याची खात्री केली. दरम्यान भंगारवाला सज्जाद यात्रा माझे मोबाईलवर कॉल आला असल्याने मी पुन्हा त्याला कॉल केला असता सज्जाद मला म्हणाला की, 'किधर हो' असे म्हणुन 'एक घंटे मे आ जाव' असे म्हणाला.

त्यानंतर पो.नि.धोक्रट व सपोआ. ठाकरे यांनी मला लाचेच्या पैशाची जुळवा–जुळव करण्यास सांगितले असता माझे बचतीमधील रुपये २५,०००/– व माझे नातेवाईक रियाज अहमद उर्फ मामू यांचेकडून रुपये २५,०००/– हातउसने असे एकूण ५०,०००/– रुपये (रु.२०००च्या भारतीय चलनातील १२ नोटा व रु. ५०० च्या भारतीय चलनातील ५२ नोटा) पोनि धोक्रट यांचेकडे दिल्या असता त्यांनी सदर नोटांच्या छायांकित प्रती काढून त्यावर उपस्थित पंचांच्या सहया घेतल्या तसेच पोनि धोक्रट यांनी देखील स्वाक्षरी केली. त्यानंतर पोनि धोक्रट यांनी रु. ५०,०००/– रकमेच्या नोटांना पोलीस वाहनावरील पोलीस शिपाई चालक क्र.१४०२५०/गारळे यांचेमार्फत पंचासमक्ष अँथ्रेसिनची पावडर कापसाच्या बोळयाने लावली व त्या नोटा पोलीस चालक गारळे यांनी त्यांचे हाताने माझे पॅन्टचे डाव्या खिशात ठेवल्या. त्यानंतर पो.नि. धोक्रट यांनी भंगारवाला सज्जाद यांनी पैसे स्विकारल्यानंतर डोक्यावरुन हात फिरविण्याबाबत इशारा देण्यास सांगितले व माझे बनियनचे आतील बाजूस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन लावले व पंच श्री. कांबळे यांचेसह जी.पी.रोड,काळाचौकी येथे भंगारवाला सज्जाद यांना भेटण्यास गेलो असता तेथे भंगारवाला सज्जाद हे त्यांचे दुकानात होते, त्यावेळी मी तेथे त्याला भेटलो असता, भंगारवाला सज्जाद याने त्यांच्या मोबाईलवरुन श्री.अशोक रोकडे यांना मोबाईलवर फोन करुन मी ५० हजार रुपये घेवून आल्याबाबत कळविले असता श्री.रोकडे यांनी सदरची रक्कम घेण्यास सांगितली असता मी माझे पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवलेली रक्कम काढून सज्जाद

याच्या हातामध्ये दिली असता सज्जाद याने उजव्या हाताने स्विकारुन सदरची रक्कम त्याने स्वत:च्या पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यावर मी माझे डोक्यावरुन हात फिरवुन लाचेची रक्कम दिल्याबाबतचा इशारा सापळा पथकास दिला. त्यानंतर सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी भंगारवाला सज्जाद यास तात्काळ ताब्यात घेतले.

तरी लोकसेवक श्री. नितीन जाधव व श्री. अशोक रोकडे यांनी झोपडीधारक याला पात्र ठरवुन नविन घर देण्यासाठी यापुर्वी वेळोवेळी रु. ३,००,०००/– घेतले व सदर घराचे अलॉटमेंटची मुळ कागदपत्र देण्याकरीता दिनांक १५/०५/२०१८ रोजी पुन्हा माझेकडुन रु. ५०,०००/– लाचेची मागणी करुन खाजगी इसम नामे भंगारवाला सज्जाद याचे मार्फतीने रु. ५०,०००/– लाच स्विकारली. म्हणून माझी श्री. नितीन जाधव, श्री. अशोक रोकडे व खाजगी इसम भंगारवाला सज्जाद खान यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझे व लोकसेवक श्री. नितीन जाधव, श्री. अशोक रोकडे व भंगारवाला सज्जाद खान यांच्यामध्ये कोणताही अर्थिक व्यवहार नसून, माझे त्यांचेबरोबर कोणतेही पूर्ववैमनस्य नाही.

माझे शिक्षण इयत्ता सातवी पर्यंत हिंदी माध्यमातून झाले आहे. परंतु मला साधारण मराठी वाचन करता येते. या कारणास्तव मी सांगितलेली तक्रार पोनि. गणेश धोक्रट यांनी लॅपटॉपवर मराठीत टंकलिखित केली व मला वाचून दाखविली व हिंदीत समजावून सांगितली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर असल्याची मी खात्री केली.

समक्ष,

( गणेश धोक्रट )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

पंच (१)

(२)

जबाब दिनांक– १७/०५/२०१८

श्री. मोहम्मद अमीर मोहम्मद जहीर शाह, ४९ वर्षे, धंदा–टॅक्सी ड्रायव्हर, राहि– रुम नं.५, आझाद नगर, अकबर लाला कंम्पाऊंड, डी.व्ही.एस.रोड, घाटकोपर (पश्चिम), मुंबई– ४०००८६, मो.क्र. ९७६९१४९२०७.

........

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझे कुटूंबीयांसोबत जन्मापासून राहत आहे. मी पुर्वी मोटार ड्रायव्हींग स्कुल चालविण्याचा व्यवसाय करीत होतो. सदरचा धंदा कमी झाल्याने सध्या मी टॅक्सी चालवित्त आहे. टॅक्सी व्यवसाय उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित आहे. तसेच फावल्या वेळेत समाजसेवा करण्याचे कार्य करीत आहे. त्यामध्ये गरजू लोकांची सरकारी कार्यालयामधील छोटी मोठी कामे करतो.

कॉटनग्रीन, जकारीया बंदर, रेल्वे लाईन लगत असलेली झोपडपट्टी महानगर पालिकेमार्फत तोडण्यात आल्याने झोपडपट्टीमधील लोक बेघर झाले होते. त्या लोकांनी आझाद मैदान, मुंबई येथे आंदोलन केले होते. त्यामध्ये माझे ओळखीचे इजहार, किस्मत अली व हदीस हे झोपडपट्टीधारक मला भेटून आमचे एफ/साऊथ वॉर्ड, परेल, मुंबई येथे घर मिळविण्याकरीता पात्रतेचे काम म.न.पा. कार्यालयाकडुन करुन दया, अशी त्यांनी मला विनंती केली.

त्यावर माझे ओळखीच्या लोकांच्या तोडलेल्या झोपडयांच्या कागदपत्राबाबत एफ/साऊथ वॉर्ड, म.न.पा. कार्यालयात जावून संबधीत अधिकाऱ्यांला जावून भेटलो असता त्यांचे नांव श्री नितीन जाधव असल्याचे मला समजले. मी त्यांना झोपडपट्टी धारकांचे कागदपत्र दाखविले. त्यावर त्यांनी मला त्यांचा पी.ए. श्री अशोक रोकडे यांना भेटण्यास सांगितले. तेव्हा मी श्री अशोक रोकडे यांना भेटून सदरची कागदपत्रे दाखविली. श्री रोकडे यांनी मला सांगितले की, ''प्रत्येक झोपडीधारकाला नवीन घर मिळण्याकरीता रु. ५ लाख दयावे लागतील'' त्यावर मी त्यांना सांगितले की, सदरचे '' झोपडीधारक हे गरीब लोक असून एवढी रक्कम ते देवु शकत नाही, काही कमी करा''. असे म्हणालो असता, श्री रोकडे यांनी रु. ४ लाख रक्कम दयावी लागेल असे सांगितले त्यातील पहिली रक्कम काम होण्याअगोदर म्हणजे रु. ३ लाख पहिले दयावे लागतील असे सांगितले, त्यास मी तयार झालो. त्याप्रमाणे झोपडीधारक इजहार अली यांची कागदपत्र रोकडे यांना दिली. जानेवारी २०१८ मध्ये रोकडे यांच्या सांगण्यावरुन त्यांचा मित्र भंगारवाला सज्जाद याच्याकडे रु.१,३०,०००/– दिली होती. त्यानंतर रु. १,८०,०००/– इतकी रक्कम फेब्रुवारी २०१८ मध्ये श्री रोकडे यांना दिली होती. सदरची रक्कम मिळुन रु.३,१०,०००/– रक्कम दिली आहे. त्यानंतर मी, नितीन जाधव साहेब यांना जावून भेटलो व पैश्याबाबत विचारणा केली असता त्यांनी रोकडे यांचेकडून घराची चावी घेण्यासाठी सांगितले. त्याप्रमाणे रोकडे यांनी शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई येथील घराची चावी व अलॉटमेंटची झेरॉक्स मला दिली. त्यावर झोपडीधारक इजहार याने माझेकडे नवीन घराचे ओरीजनल अलॉटमेंटचे पेपर मागितले असता मी त्याला म्हणालो की, मी साहेबांशी बोलतो. त्यादरम्यान झोपडीधारक किस्मतअली व हदीस हे दोघे मला भेटले व त्या दोघांनी मिळुन रु. ३ लाख १० हजार रुपये माझेकडे दिले सदरची रक्कम मी रोकडे यांना दिली. त्यानंतर मी इजहार यांचे घराचे ओरीजनल अलॉटमेन्ट लेटरसाठी जाधव व रोकडे याना भेटलो, त्यांनी मला अजुन रु.५०,०००/– ची मागणी केली व इतर दोन झोपडपट्टीधारकांच्या कागदपत्रांची प्रत्येकी ४,००,०००/– रुपये दयावे लागतील असे सांगितले. त्यानंतर मी दिनांक ०७/०५/२०१८ रोजी जाधव व रोकडे यांना त्यांच्या एफ/साऊथ वॉर्ड कार्यालयात जावून भेटलो. त्यावेळी जाधव यांनी मला सांगितले की, अलॉटमेंट लेटरचे ५०,०००/– दयावे लागतील. सदरची

रक्कम मला त्यांना दयावयाची इच्छा नसल्याने त्यांच्याविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता मी दिनांक ११/०५/२०१८ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय, वरळी, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो.

मी दिनांक ११/०५/२०१८ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो असता, तेथे मी वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. त्यांनी माझी तक्रार ऐकून घेतली व मला सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री राजेंद्र ठाकरे व पोलीस निरीक्षक गणेश धोक्रट यांची भेट घालून दिली. त्यानंतर मी पो.नि. धोक्रट यांना भेटुन माझी लोकसेवक श्री. जाधव व श्री रोकडे यांनी घराचे अलॉटमेन्टचे मुळ कागदपत्र देण्यासाठी माझेकडे लाचेची मागणी केली असल्याबाबत लेखी तक्रार दिली व त्यावर मी सही केली आहे

तरी लोकसेवक श्री. नितीन जाधव व श्री. अशोक रोकडे यांनी झोपडीधारक याला पात्र ठरवुन नविन घर देण्यासाठी यापुर्वी वेळोवेळी रु. ३,१०,०००/— घेतले व सदर घराचे अलॉटमेंटची मुळ कागदपत्र देण्याकरीता दिनांक १५/०५/२०१८ रोजी पुन्हा माझेकडून रु. ५०,०००/— लाचेची मागणी करुन खाजगी इसम नामे भंगारवाला सज्जाद याचे मार्फतीने रु. ५०,०००/— लाच स्विकारली म्हणून मी श्री. नितीन जाधव, श्री. अशोक रोकडे व खाजगी इसम भंगारवाला सज्जाद खान यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद दिली आहे.

माझे शिक्षण इयत्ता सातवी पर्यंत हिंदी माध्यमातून झाले आहे. परंतु मला साधारण मराठी वाचन करता येते. या कारणास्तव मी सांगितलेली तक्रार पोनि. गणेश धोक्रट यांनी लॅपटॉपवर मराठीत टंकलिखित केली व मला वाचून दाखविली व हिंदीत समजावून सांगितली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर असल्याची मी खात्री केली.

समक्ष,

( गणेश धोक्रट )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

[signature] मो० आमिर शेख